# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जिल्हा-रायगड, पनवेल ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२

ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com


जा.क्र. पमपा/मातंवि/प्र.क्र.०३/३४२४/ १२३ /२०२५ दिनांक : २९/०३/२०२५

## स्वारस्य अभिव्यक्ती

## EOI

**कामाचे नाव :** पनवेल महानगरपालिकेमार्फत नागरिकांना ई सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता ई सेवा केंद्र सुरू करण्याकरिता ग्रामस्तरीय उद्योजक **/Village Level Enterprises (VLE)** या संस्थांची नेमणूक करणेबाबत

नागरिकांच्या सोयीकरिता शासनामार्फत अनेक सेवा या विविध ई सेवा केंद्रा मार्फत पुरविल्या जातात. सदरचे ई सेवा केंद्र चालक हे ग्रामस्तरीय उद्योजक/ Village Level Enterprise (VLE) म्हणून शासनामार्फत नोंदणीकृत करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाने सुरू केलेला एक डिजिटल उपक्रम याअंतर्गत, नागरिकांना विविध सरकारी सेवा सोप्या आणि जलद पद्धतीने उपलब्ध होत आहेत. विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाने, अनुज्ञप्ती, जमिनीचे दाखले, आणि इतर सरकारी सेवा या ई सेवा केंद्राद्वारे पुरविल्या जात आहेत. सदरच्या सेवा ह्या महानगरपालिकेच्या कार्यालयात सेवा हमी व हक्क कायद्याअंतर्गत ई सेवाकेंद्राद्वारे चालू करण्याचे सूचीत करण्यात आले आहे.

सदरचे ई सेवा केंद्र हे शासन मान्यता असलेल्या ग्रामस्तरीय उद्योजक (VLE) यांची नेमणूक करून पनवेल महानगरपालिका कार्यालयांत चालू करावयाचे आहे. तरी सदरचे केंद्र हे महापालिकेच्या कार्यालयात चालू करून नोंदणीकृत असलेल्या ग्रामस्तरीय उद्योजक (VLE) यांना जागा देवून त्या जागेची काही ठोक रक्कम ही सदर ग्रामस्तरीय उद्योजक (VLE) यांच्या कडून महापालिकेने आकारायची आहे. सदरच्या ई सेवा केंद्राला २५० ते ३०० चौ. फुट इतक्या जागेत कार्यालय तयार करून तसेच फर्निचर, संगणक, संगणक साहित्य तसेच इंटरनेट सुविधा या सर्व बाबींची पुर्तता महानगरपालिका करणार आहे.

सदर ई सेवा केंद्र हे महापालिकेच्या पनवेल, न्यु पनवेल, कामोठे आणि खारघर या ०४ ठिकाणी मालमत्ता कर विभागाने भाडेतत्वावर घेतलेल्या जागेतील कार्यालयांमध्ये सुरू करावयाचे आहे. या ई सेवा केंद्रांवर विविध प्रकारची प्रमाणपत्रे, परवाने, अनुज्ञप्ती, जमिनीचे दाखले, आणि इतर सरकारी सेवा या ई सेवा यांसोबतच महानगरपालिका नागरिकांना पुरवित असलेल्या सेवा पुरविणे हे अपेक्षित आहे.

याकरीता निश्चित केलेल्या सेवा शर्ती खालीलप्रमाणे :

१) निविदा प्रक्रियचा तपशील www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. याबाबत काही अडचणी येत असल्यास ०२२-२७४५८०४० (सकाळी 10 ते सायं. 5) या हेल्प लाईनवर संपर्क साधवा.

२) प्राप्त निविदातील एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क महापालिकेने रोखुन ठेवला आहे.

३) करारपत्रात सुधारणा करण्याचे, बदल करण्याचे व तारीख पुढे ढकलण्याचे अधिकार निविदा स्विकारण्याच्या तारखेपर्यंत राखून ठेवीत आहेत आणि त्याबाबत निविदाकारास पत्राने किंवा वर्तमानपत्रात सुचना देऊन किंवा जसे महापालिकेस सोयीचे होईल त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

४) निविदाकाराला सदरचे काम हे इतर संस्थेस/ व्यक्तीस कोणत्याही प्रकार हस्तांतरीत करता येणार नाही.

५) ई सेवा पुरवठा धारकाचा कार्यकाल हा करारनाम्याच्या दिनांकापासून 3 वर्ष इतका असेल.

सदरचे काम हे तीन वर्षाकरिता असून पुढील निविदा मंजुर होईपर्यंत ठोक रक्कम दराने सदरचे सेवा पुरविण्यात येईल

- **लिफाफा क्र.१** (Technical Envelope)

**अ) निविदाधारकाने** Technical Envelope **मध्ये सादर करावयाचे दस्ताऐवज खालीलप्रमाणे-**

- ग्रामस्तरीय उद्योजक **/Village Level Enterprises** (VLE) म्हणून शासनामार्फत नोंदणीकृत असावा व तसा पुरावा सादर करण्यात यावा.
- सेतु केंद्र चालवण्याबाबत अनुभव असणे आवश्यक आहे.(संमतीपत्र अथवा पुरावा)
- पनवेल महानगरपालिकेच्या ई सेवा नागरिकांना या सदरच्या केंद्रामार्फत पुरविण्याचे हमीपत्र.
- पॅन कार्ड अथवा जी. एस.टी रजिस्टेशन सर्टिफीकेक्ट.

- **लिफाफा क्र.२** (Commercial Envelop)

ब) निविदाधारकाने प्रपत्र दरपत्रक **Commercial Envelop** मध्ये सादर करण्यात यावे.

- विहित नमुन्यात दरपत्रक: सर्व सामान्य अति व शर्ती
  **१)** जोडपत्र अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवीदाधारकाने रक्कम भरणे बंधनकारक राहील.

लिफाफा क्र.१ मधील तांत्रिकबाबींची परीपूर्तता न केल्यास लिफाफा क्र.२ चा लखोटा उघडण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**ई-सेवा पुरविण्याचे ठिकाण:-**

| अ. क्र. | ठिकाण |
|---|---|
| १. | पनवेल |
| २. | खारघर |
| ३. | कामोठे |
| ४. | नवीन पनवेल |

# जोडपत्र – अ

| अ.क्र | कामाचे नाव | |
|---|---|---|
| | **पनवेल महानगरपालिकेमार्फत नागरिकांना ई सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता ई सेवा केंद्र सुरू करण्याकरिता agency नेमणेबाबत. (03 वर्षांकरिता)** | |
| | | **ठोक रक्कम प्रती महिना. (GST सहीत)** |
| **०१** | **पनवेल** | |
| **०२** | **खारघर** | |
| **०३** | **कामोठे** | |
| **०४** | **नवीन पनवेल** | |

**टीप:**

१. **प्रत्येक ठिकाणांनुसार स्वतंत्र H१ निविदाधारक ग्राह्य धरण्यात येईल.**

पनवेल महानगरपालिकेमार्फत नागरिकांना ई सेवा सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता ई सेवा केंद्र सुरू करण्याकरिता ग्रामस्तरीय उद्योजक **/Village Level Enterprises (VLE)** या संस्थांची नेमणूक करणेबाबत. (03 वर्षांकरिता) (03 वर्षांकरिता) इच्छुक ग्रामस्तरीय उद्योजक यांच्याकडून दोन लिफाफा पद्धतीने होकारपत्र व दरपत्रक बंद पाकीटात दिनांक ०९/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका मुख्यालय, पनवेल, येथे स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) सादर करावेत.

**Sd/-**
**उप आयुक्त (I)**
**पनवेल महानगरपालिका**